म. ग्रं. सं. ठाणें

विषय

संग्रहालय क्रमांक

८७७

सन

लेखक ओंकर गणेश...

पुस्तकाचें नांव ... संग्र...

८

म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. नं.



नं० ) # चातुर्यसंग्रह. ( ४था.

अथवा

## बादशाहा अकबर व प्रधान बिरबल यांच्या मनोरंजक गोष्टी.

### भाग २ रा.

हें पुस्तक
" शंकर गणपत चिंचणकर "
यांनीं मुंबईत
' बापू हरशेट देवळेकर ' यांचे छापखान्यांत छापून
प्रसिद्ध केलें.
सुधारून वाढविलेली आवृत्ति २ री.

शके १८१४ सन १८९२
किंमत ३ आणे.

( ह्या पुस्तका संबंधीं सर्व प्रकारचे हक्क
' शंकर गणपत चिंचणकर ' यांनीं आपले
स्वाधीन ठेविले आहेत )

नं. २०१

# बादशहा अकबर व प्रधान बिरबल

# यांच्या मनोरंजक गोष्टी.

## भाग २ रा.

### गोष्ट १ ली.

( बिरबल व तानसेन )

अकबर बादशहाचे पदरीं तानसेन या नांवाचा मुसलमान जातीचा एक नामांकित गवई होता. तो गायनविद्येंत केवळ गंधर्वांप्रमाणें परिपूर्ण असा असल्यामुळें तो सर्वांस प्रिय झाला होता; त्यास बिरबलाची जागा देववून आपला हेतू साधावा असा सर्व मुसलमान लोकांनीं विचार केला.

नंतर एके दिवशीं सर्व मुसलमान लोकांनीं विचार करून एका बंगल्यांत उत्तम प्रकारची आरास केली व त्या ठिकाणीं तानसेन याचें गाणें करावयाचें असा बेत करून बादशहासही बोलावणें केलें. पुढें सर्व मंडळी जमल्यावर तानसेनानें प्रथमतः दीपराग आळवण्यास सुरवात केली; त्याबरोबर एकाएकीं बंगल्यांतील सर्व दीप प्रज्वलीत झाले. हा प्रकार पाहून बादशहा आश्चर्यानें अगदीं थक्क होऊन गेला. नंतर तानसेनानें सर्व राग

–रागिणी उत्तम प्रकारें गाऊन बादशहास व सर्व सभासदांस आनंदित करून सोडलें. पुढें गायन आटोपल्यावर अमीरउमराव व मुत्सद्दी वगैरे मंडळी बादशहाची सुप्रसन्न मर्जी पाहून ह्मणाली:–"तानसेन बिरबलापेक्षां किती गुणी आहे हें खावंदाच्या नजरेस आलेंच असेल; तरी अशा गुणी मनुष्यास बिरबलाची पदवी मिळावी हें योग्य आहे." हें त्यांचें भाषण ऐकून बादशहा ह्मणाला–"तानसेन कितीही गुणी असला तरी बिरबलाचे गुणांपुढें त्याचे गुण व्यर्थ आहेत. आतां या गोष्टीची जर तुह्मांस प्रचीति पहावयाची असेल तर ती थोडक्याच दिवसांत मी तुह्मांस दाखवीन." इतकें बोलणें झाल्यावर ती सभा विसर्जन झाली.

नंतर दुसरे दिवशीं बादशहानें रूसदेशाच्या बादशहास एक पत्र लिहिलें त्यांतील आशय हा कीं, "तानसेन व बिरबल या दोघांस तुह्मांकडे पाठविलें आहे; तरी पत्रदर्शनीं यांचा शिरच्छेद करावा." मग त्यावर आपली मोहोर करून तें पत्र बिरबल व तानसेन यांचे स्वाधीन केलें. आणि त्यांस रूसदेशाचे बादशहाकडे जाऊन पत्राचें उत्तर आणावयास सांगितलें.

बादशहाच्या आज्ञेप्रमाणें दुसरे दिवशीं तानसेन व बिरबल रूसदेशास जाण्याकरितां निघाले व कांहीं दिवसांनीं तेथें जाऊन पोहोंचले. नंतर दरबारांत जाऊन उभयतांनींही बादशहास वंदन करून अकबरानें दिलेलें पत्र सादर केलें. बादशहानें त्यांतील मजकूर वाचून तत्क्षणींच सेवकांस आज्ञा केली कीं, "या दोघांस शहराबाहेरील मैदानांत नेऊन यांचा शिरच्छेद करावा." अशी बादशहाची आज्ञा होतांच सेवकांनीं तानसेनास व बिरब-

लास पकडून वधस्थळाकडे घेऊन चालविले. तेव्हां तानसेन अतिशय भयाभीत होऊन रडूं लागला. हें पाहून बिरबल ह्मणाला—"आतां रडून काय उपयोग! तूं मजपेक्षां गुणांनीं श्रेष्ट आहेस सबब बिरबलाची पदवी तुला मिळावी अशी तुझ्या जातभाईनीं बादशहास विनंति केल्यावरून त्यानें तुझ्या अकलेची परिक्षा करण्याकरितांच हा असा प्रसंग आपणां उभयतांवर आला आहे तरी आपल्या गुणप्रभावानें हें संकट निवारण कर." हें ऐकून तानसेन ह्मणाला—"तूं मोठा परोपकारी असून तुझे गुण अप्रतिम आहेत सबब मी तुला शरण आलों आहें. तरी माझा उपहास न करितां प्राणरक्षणाची एखादी युक्ति सत्वर शोधून काढ." तानसेनाचें हें निर्गर्वी भाषण ऐकून बिरबल ह्मणाला—"तानसेना, भीति सोडून धैर्य धर व मी सांगेन तसा वाग ह्मणजे संकट विरहित होशील." तानसेनानें त्याप्रमाणें वागण्याचें कबूल केल्यावर बिरबल ह्मणाला—"ज्यावेळेस आपणास वधस्थानीं नेतील त्यावेळीं मी तुला मागें सारून "माझें शीर प्रथम तोडा' असें ह्मणेन.' त्याप्रमाणें तूंही मला मागें सारून 'माझें शीर प्रथम तोडा, असें ह्मण; व आपली मुद्रा आनंदकारक अशी दाखिव, मग पुढें जें काय बोलावयाचें तें मी बोलेन."

चालतां चालतां कांहीं वेळानें ते वधस्थानाजवळ येऊन पोहोंचले. तेव्हां तानसेन पुढें होऊन 'मला आधीं मारा' असें मारेकऱ्यांस ह्मणाला:—इतक्यांत बिरबल पुढें होऊन 'मला आधीं मारा' असें ह्मणाला. तोंच तानसेन बिरबलास मागें सारून आपणांस अगोदर मारण्याविषयीं त्यांची प्रार्थना करूं लगला.

अशा रीतीनें ते एकमेकांस मागें सारून 'माझा शिरच्छेद अगोदर करा' असें ह्मणूं लागले.

हा अद्भुत प्रकार पाहून सेवक आश्चर्यभरित होऊन ह्मणाले —हे किती अज्ञानी आहेत. प्रत्यक्ष प्राणांताचा समय आला असतांही आनंदवृत्तीनें एकमेकांस मागें सारून अगोदर मरण यावें ह्मणून भांडत आहेत तस्मात् हा आश्चर्यकारक प्रकार बादशहास कळवून जसा हुकूम होईल तसें वर्तावें हें बरें. असा विचार करून ते त्या उभयतांसही घेऊन दरबारीं गेले व झालेला सर्व मजकूर त्यांनीं बादशहास निवेदन केला. तो ऐकून बादशहा ह्मणाला " सर्व प्राण्यांस जीवितापेक्षां कोणतीच वस्तु प्रिय नाहीं असें असतां मोठ्या उत्सुकतेनें तुह्मी एकमेकांस मागें सारून अगोदर मरण घेण्यास तयार होतां याचें कारण काय तें मला सांगा. हें ऐकून बिरबल ह्मणाला—"ही गोष्ट तुह्मी विचारूं नये व आह्मी सांगूंही नये, कारण तेणेंकरून आमचें फार नुकसान होणार आहे. व ज्या हेतूनें अकबर बादशहानें आह्मांस येथें पाठविलें आहे तो त्याचा हेतूही लयास जाईल. आमचा शिरच्छेद करण्याविषयीं आपणांस अकबर बादशहानें लिहिलें आहे त्यावरून यांत कांहीं तरी महत्व आहे असें पूर्वींच आपणांस वाटावयास पाहिजे होतें. कारण आमचा प्राण घेणें अकबरबादशहास कोणत्याही प्रकारें अशक्य नव्हतें. असें असतां ज्या अर्थी मुद्दाम त्यानें आह्मांस आपलेकडे पाठविलें त्या अर्थी महत्वाच्या कारणाशिवाय पाठविलें नाहीं हें सिद्ध होतें. यास्तव उशीर न लावितां अगोदर मला मारा व मागून तानसेनाचा प्राण

घ्या." बिरबलाचें अशा रीतीचें संदिग्ध भाषण ऐकून बादशहाची उत्कंठा वाढून तो ह्मणाला जर तुह्मी कारण सांगणार नाहीं तर मी तुमचा शिरच्छेद करणार नाहीं. ज्या हेतूनें त्यानें तुह्मांस मजकडे पाठविलें तो हेतू लवकर सांगा. बिरबल ह्मणाला–मी जें कारण सांगेन तें ऐकतांच आपण ताबडतोब माझा शिरच्छेद करावा व आह्मी जें सांगू तें अकबरास न कळविण्याविषयींची खबरदारी ठेवावी. बादशहानें त्या दोन्ही गोष्टी मान्य केल्यावर बिरबल ह्मणाला–तुमचें राज्य हस्तगत करून घेण्याचा अकबरबादशहाचा फार दिवसांपासून मनोदय आहे. तथापि तुह्मी स्वतः रणशूर असल्यामुळें युद्ध करून हेतु साध्य होणार नाहीं; असें वाटल्यावरून त्याचा निरुपाय झाला परंतु प्रस्तुत बादशहाचा गुरु मक्केहून आला आहे त्याजपाशीं त्यानें आपलें राज्य कोणत्या रीतीनें हस्तगत होईल याविषयीं अर्ज केला. तेव्हां त्यानें सांगितलें कीं, रूसदेशचा बादशहा मोठा पुण्यप्रतापी आहे सबब त्याचें राज्य नष्ट होणार नाहीं; परंतु त्याचे हातून जर दोन निरपराधी मनुष्यें मारलीं जातील तर मात्र तो तत्काळ मरण पावून ज्याचा अगोदर शिरच्छेद होईल त्यास राज्यपद व ज्याचा मागून होईल त्यास प्रधानकी प्राप्त होईल. आह्मा दोघांवर बादशहाचा अतिशय लोभ असल्यामुळें आह्मांस त्या कामीं योजून आपणाकडेस पाठविलें आहे, तरी आतां विलंब न करितां प्रथमतः माझा व मागून माझ्या मित्राचा वध करा. बिरबलाचें हें भाषण ऐकून बादशहा ह्मणाला–असें आहे तर माझ्या हातून तुमचा कधींही शिरच्छेद होणार नाहीं.

कारण विष समजून त्याची परीक्षा कोण पाहील? असें ह्मणून त्यानें "तुह्मी लिहिलेलें काम करण्याची आह्मांस जरूर नाहीं.,, अशा अर्थाचें पत्र लिहून तें बिरबलाजवळ देऊन त्यास आपल्या देशास जावयास सांगितलें. नंतर बिरबल व तानसेन फारच दिलगिरी दाखवून तेथून निघाले ते कांहीं दिवसांनीं दिल्ली शहरास आले आणि बादशहास भेटून त्यांहीं आणलेला जबाब त्यास दिला. तो पाहून "तुह्मी जिवंत कसे आलां" असें बादशहानें तानसेनास विचारलें. तेव्हां घडलेला सर्व मजकूर त्यानें बादशहास निवेदन केला आणि ह्मणाला—बिरबलाच्या अकलेची धन्य असून त्याचेच अजब चातुर्यानें आमचे प्राण वांचले. हें ऐकून बादशहा आपल्या जातभाईस ह्मणालाः—मी तुह्मांस प्रथमच सांगितलें होतें त्याचा प्रत्यय आला किंवा नाहीं? बादशहाच्या तोंडचीं हीं अक्षरें ऐकतांच बिरबलाचा द्वेष करणारी, काजी वगैरे सर्व मंडळी अगदीं खजिल होऊन गेली.

---

## गोष्ट २ री.

### ( स्वर्गवास व नर्कवास. )

एके दिवशीं बादशहानें बिरबलास विचारलें की. स्वर्गवास कोण पावतो व नर्कवास कोण पावतो?' तें सांग. बिरबल ह्मणाला 'ज्या मनुष्यास मेल्यावर लोक बरें ह्मणतात तो स्वर्गवास पावतो. आणि ज्याला मेल्यावर लोक वाईट ह्मणतात तो नर्कवास पावतो.' हें ऐकून बादशहा खुषी झाला.

## गोष्ट ३ री.

( बिरबलानें करीम न्हावी स्वर्गास पाठविला. )

बिरबल हा अचाट बुद्धिवान असल्यामुळें बादशहाची त्याजवर फारच मर्जी होती; हें बाकीच्या मुत्सद्दी लोकांस न आवडून बिरबल त्यांच्या डोळ्यांत रात्रंदिवस खुपूं लागला. त्यांनीं त्याचा नाश करण्याचा पुष्कळदां विचार केला. परंतु त्यांत यश न येतां उलट त्याची कीर्ति वाढत चालली, सबब एखादी अचाट युक्ति योजून ह्याचा समूळ नाश करावा असा त्यांनीं बेत केला बादशहाजवळ फार सलगीचें भाषण बिरबलाशिवाय दुसरा कोणी करीत नसे. फक्त एक करीम नामक ह्मातारा न्हावी त्याची हजामत करीत असे, तो मात्र कधीं कधीं विनोदाचीं भाषणें त्याजजवळ मोकळेपणीं बोलत असे. ह्मणून मुत्सद्दी लोकांनीं बिरबलाविषयीं बादशहाचे मनावर कांहीं तरी भलता ग्रह उत्पन्न करून त्याचा नाश करण्याचें काम त्यास सांगितलें व त्याबद्दल मोठें बक्षीसही देऊं केलें.

नंतर एके दिवशीं हजामत करीत असतां तो करीमन्हावी बादशहास ह्मणाला महाराज, "आपल्या हजामती वरून मला आज आपल्या वडिलांची आठवण झाली. त्यांची प्रकृति किती तरी नाजूक! त्यांस तुमच्यासारखा जराही वस्तारा सोसत नसे. महाराज, त्यांजजवळ मी एकंदर तीस वर्षें काम केलें. पण एक दिवसही त्यांचा म ह्मणवून घेतला नाहीं. हल्लीं ते स्वर्गवासी झाल्याला आज १२ वर्षें झालीं. पण त्यांजकडील समाचार बि-

लकुल समजत नाहीं, व आपणही त्यांजकडील कांहींच खब आणवीत नाहीं हें कसें? बादशहा ह्मणाला "अरे वेड्या! स्वर्ग लोकीं जीं माणसें जातात त्यांचा समाचार भूलोकीं कसा कळेल तेथें काय जासूद पाठवितां येतात?" न्हावी ह्मणाला-"छी महाराज स्वर्गलोकींचा समाचार आणणें हें काम काय हलक्य सलक्या जासुदाच्या हातून होण्याजोगें आहे! तें काम एव बिरबलच करूं जाणें. कारण तो मोठा चतुर आहे. आतां त्यास युक्ति हीच कीं, ब्राह्मणाचे स्मशानामध्यें चिता रचून मोठ्या स मारंभानें त्यास आंत निजवावें आणि आग लावून द्यावी ह्मणजे तो धुराबरोबर वर चढेल. आहाहा! काय त्याची पुण्याई सांगूं! तें काम त्यासच योग्य. महाराज, आपण एकवार खर्चास न भितां त्यास वर पाठवून आपल्या वडिलांची खबर आणवा."

वृद्ध न्हाव्याचें हें बोलणें बादशहास खरें वाटलें. मग त्यानें बिरबलास बोलावून आणून त्यास ह्मटलें, "तूं एकवार जर माझ्या वडिलांचा समाचार घेऊन येशील तर फार चांगलें होईल." बिरबलानें उत्तर केलें "महाराज, स्वर्गलोकीं जाणें ही गोष्ट मनुष्यास सर्वस्वीं दुर्लभ असून ह्या कार्यसिद्धीकरितां कितीएक दिवस अनुष्ठानें व होमहवनें केलीं पाहिजेत; व त्यास द्रव्यही पुष्कळ पाहिजे यास्तव ह्या गोष्टीस माझ्यानें रुकार देववत नाहीं. पण इतकें असूनही आपली खर्च करण्याचीच इच्छा असेल तर तुमची आज्ञा मला शिरसावंद्य आहे. फक्त पांच लक्ष रुपये माझ्या स्वाधीन करा ह्मणजे आजपासून सहा महिन्यांचे आंत आपल्या वडिलांचा समाचार घेऊन येतों." बादशहानें ती गोष्ट

मान्य केली. मग बिरबलानें पुष्कळ खर्च करून स्मशानांतून [illegible] कोशपर्यंत गुप्तपणें एक भुयार तयार करविलें आणि एके दिवशीं रात्रीं मोठ्या समारंभानें न्हाव्यानें सांगितल्याप्रमाणें चिता तयार करवून बादशहा, न्हावी व दुसरे कितीएक लोक ह्यांच्यासमक्ष तो चितेंत जाऊन निजला; मग बादशहानें ती पेटवितांच पूर्वी केलेल्या वाटेनें तो बाहेर पडून गेला बिरबल आतां अपल्या वडिलांचा समाचार आणील व स्वर्गलोकींच्या दुसऱ्याही पुष्कळ खबरा सांगेल ह्मणून बादशहास मोठा आनंद झाला आणि आपले हृदयांतील रात्रंदिवस सलणारा कांटा निघाला ह्मणून मुत्सद्दी लोकांसही मोठें समाधान वाटलें. मग त्यांनीं न्हाव्याच्या युक्तीची अतिशय तारीफ करून त्यास पुष्कळ इनाम दिलें.

इकडे बिरबल गुप्त रीतीनें त्या नगरांतच एका घरांत सहा महिनेपर्यंत राहिला व एके दिवशीं विजेचा मोठा गडगडाट चालला आहे व पाऊसही पुष्कळ पडत आहे अशी संधी पाहून तो नगरांत प्रगट झाला. त्यानें आपल्या आंगास ठिकठिकाणीं मुद्रा ठोकून व चित्रविचित्र रंगाचीं वस्त्रें पांघरून विलक्षण रूप धारण केलें होतें; व त्यांतच सहा महिने पावेतों हजामत झालेली नसल्यामुळें त्याची चर्या इतकी निराळी दिसत होती कीं, प्रथम त्यास लोकांनीं ओळखलेंही नाहीं. बिरबल स्वर्गलोकाहून आला ही बातमी बादशहास कळतांच त्यानें त्यास मोठ्या समारंभानें दरबारीं नेलें आणि स्वर्गलोकींची इत्थंभूत हकीगत विचारिली तेव्हां बिरबल ह्मणाला, "आपण चिता पेटवितांच जो धूर उत्पन्न होऊन आकाशांत गेला त्याबरोबरच मंत्रसामर्थ्यें करून मी

वर चढलो. तेथें जातांच मला पुष्कळ विमानें दिसूं लागलीं. त्यांपैकीं मी एकांत जाऊन बसलों, आणि मला स्वर्गलोकाकडे जावयाचें आहे अशी आपली इच्छा त्यास दर्शवितांच तें मला तिकडे घेऊन गेलें. महाराज तेथील चमत्कार काय सांगावा? आजपावेतों पुष्कळ तपश्चर्या करून व यज्ञयागादिक सत्कर्मे आचरून मोठमोठ्या राजकुलांतील पुरूषही स्वर्गलोकची इच्छा करीत आले ती उगाच नव्हे कारण तेथील रहिवासी जीं सुखें अनुभवित आहेत तीं सागतां येत नाहींत. त्यांचें वास्तवीक स्वरूप स्वतःचे अनुभवावाचून कळावयाजोगें नाहीं; अहाहा! काय त्या अमृताची गोडी! रंभांचें नृत्य–गायन तरी किती मनोहर! महाराज, खरोखर विचाराल तर माझे मनांत परत इकडे यावयाचें नव्हतें. व तेथल्या सुखास भुलून मी आपल्या आज्ञेचा अनादर केला असता, पण काय करूं! आपल्या वडिलांचा अतिशय आग्रह पडला. कारण तेथें त्यांस इतकीं सुखें आहेत तरी एका गोष्टीची मोठीच अडचण आहे. आतां ती कोणती ह्मणाल तर, स्वर्गलोकांतील रहिवाशांस ह्या जगांतील लोकांप्रमाणें उदरनिर्वाहाकरितां मुळींच श्रम करावे लागत नाहींत. कारण तेथें लागेल तितकें अमृत मिळतें. व तें पिऊन असें समाधान होतें कीं, इहलोकीचीं सर्व पक्वान्नें त्यापुढें रद्द आहेत. ह्याप्रमाणें पोटाची सोय असल्यामुळें कोणी कोणाची पर्वा ठेवीत नाहीं; त्यामुळें आपल्या वडिलांस हजामतीची मोठी पंचाईत पडते. आपल्या करीम न्हाव्याचा बाप तेथें आहे तो मोठ्या मिनतवारीनें केव्हां केव्हां त्यांच्या उपयोगीं पडतो; परंतु त्याचा हात फार जड

आहे व आपल्या वडिलांची प्रकृति फार नाजूक असल्यामुळें त्यांस वस्तारा अगदीं सोसत नाहीं ह्मणून ते अलीकडे हजामतच करीत नाहींत. महाराज. आपल्या वडिलांसारख्यांची अशी दशा मग माझ्यासारख्या गरिबास तेथें कोण विचारतो? आज सहा महिने माझी हजामत मुळींच झाली नाहीं तेथील इतर सुखांत रंगून गेल्यामुळें मला त्याबद्दलचें फारसें कांहीं वाटलें नाहीं, पण आपल्या वडिलांची हजामत माझ्या चौपट वाढली असल्यामुळें त्यांस अतिशय त्रास झाला आहे. इहलोकीं असतां आपला करीम न्हावी मात्र त्यांच्या पसंतीस उतरला होता त्यामुळें त्याची ते वारंवार आठवण काढीत असतात. एके दिवशीं ते मला ह्मणाले, "बिरबला, तूं भूलोकीं परत जाऊन ही गोष्ट बादशहाच्या कानावर घालून एखादा चांगला न्हावी इकडे पाठवून दे." महाराज माझ्या मनांत परत इकडे यावयाचें नव्हतें. पण काय करूं? आपल्या वडिलांची आज्ञा माझ्यानें मोडवेना ह्मणून तेथील सर्व सुखांस लाथ मारून निघालों तों मेघमंडळांतून पर्जन्याच्या धारांबरोबर काल रात्रीं ह्या जमीनीवर उतरलों. झालेली हकीगत आपणास कळविली याउपर आपली मर्जी!

आतां करीम न्हाव्यास वर पाठवावयाचा असल्यास आणखी एक महिनापर्यंत नवा खर्च करावयास नको.कांकीं, मला जाण्यायेण्यास कदाचित् दोन दिवस कमजास्त लागतील ह्मणून तें स्मशान आठ महिने पावेतों मंत्रानें भारलें जावें असा मी संकल्प केला होता; त्याची मुदत अद्यापि एक महिनापर्यंत आहे. फक्त चिता मात्र पुनः तयार केली पाहिजे. बिरबलानें सांगितलेली ही

गोष्ट बादशहास मानवून त्यानें वडिलांची अडचण दूर करण्या-कारितां बलात्कारानें करीम न्हाव्यास चितेंत जाळून टाकिलें. ह्याप्रमाणें बिरबलानें आपल्यावर आलेलें अरिष्ट मोठ्या चातुर्यानें टाळून त्या न्हाव्यास यथायोग्य शासन केलें.

---

## गोष्ट ४ थी.

### ( शहाणा व मूर्ख. )

बादशहानें एके दिवशीं, बिरबलास विचारलें कीं, 'शहाणा कोणास ह्मणावें व मुर्ख कोणास ह्मणावें.' बिरबल हजरजबाबीच होता तो पटकन् ह्मणाला 'ज्याची मसलत शेवटास गेली तो शहाणा व ज्याची फसली तो मूर्ख.' हें ऐकून दरबारांतील लोक मनांत अगदीं खांति झाले.

---

## गोष्ट ५ वी.

### ( लोकांचे मनांतील हेतू सांगणें. )

एके दिवशीं बादशहा दरबारांत आल्यावर त्यानें तेथें बसले-ल्या अमीरउमरावांकडे पाहून प्रत्येकास प्रश्न केला कीं, 'येथें असलेल्या लोकांच्या मनांत काय आहे तें सांगा.' परंतु ह्या त्याच्या प्रश्नाचें उत्तर कोणी देऊं शकेना. शेवटीं बिरबलाकडे वळून त्यानें ह्मटलें 'बिरबल तुझ्यानें येथील लोकांच्या मनांत काय आहे हें सांगवेल काय? बिरबल ह्मणाला 'होय सरकार! परंतु तें पृथक पृथक सांगूं किंवा एकाच उत्तरांत सांगू;

बादशहा ह्मणाला एकाच उत्तरांत सर्वांच्या मनांतील हेतू सांग' तेव्हां बिरबल कांहीं अवकाश न लागतां ह्मणाला 'येथील बसलेल्या सर्व लोकांच्या मनांत असें आहे कीं, महाराज, आपली गादी सुरक्षित असावी व आपलें यश, कीर्ती धनदौलत हीं वृद्धिंगत व्हावीं, यांत कांहीं खोटें असल्यास प्रत्येकास विचारून पहावें.' तें ऐकून बादशहा संतुष्ट झाला.

---

## गोष्ट ६ वी.

### ( कढीवर कढी. )

एके दिवशीं एका उमरावानें आपल्या बागेंतील नामांकित आंबे बादशहास नजराणा पाठविले ते. राणी व बादशहा एकांतांत असून, खात बसले होते पण बादशहानें असा क्रम ठेवला होता कीं, आंबा चोखून त्याचीं सालें राणीच्यापुढें टाकावीं यांचें खाणें संपत आहे तोंच तेथें बिरबल येऊन पोंचला. त्याला पाहून बादशहा सहज विनोदानें ह्मणाला "बिरबल आमची नायको पहा किती खादाड आहे मी अद्याप एक आंबा पुरता खाल्ला नाहीं तोंच तिनें ( तिच्या पुढील सालांचा ढीग दाखवून) पहा इतके आंबे खाऊन टाकले." हें बादशहाचें कृत्रीम पाहून राणी अगदीं ओशाळून गेली; तें पाहून बिरबलानें तिचा पक्ष धरून सहज उत्तर केलें:—"राणीसाहेब खादाड खऱ्या पण त्यांच्या नवऱ्याची त्यांवर कढी आहे ती अशी कीं, येवढ्या वेळांत राणीसाहेबांनीं नुसता आंब्यांतील रसच तरी चोखून घेतला पण सरकारानें सालांसहवर्तमान आंबे नाहींसे केले. पहा त्यां-

च्यापुढें एक तरी साल आहे ? " हें त्याचें विलक्षण उत्तर ऐकून राणीस खूप आनंद झाला.

---

## गोष्ट ७ वी.

( बिरबलास मुसलमान करण्याचा हेतू. )

आपल्या सर्व दरबारी लोकांपेक्षां बिरबलाची अक्कल जास्त असून आपण जी त्यास वरिष्ठ अशी जागा दिली आहे ती रास्तच आहे; तरी तो ब्राह्मण असल्याकारणानें सर्व दरबारी लोक त्याच्याशीं द्वेषबुद्धीनें वागतात हें बादशहा पक्कें जाणून होता. व त्या सर्व तंट्याचें मूळ नाहींसें होण्याकरितां बिरबलानें मुसलमान धर्म स्वीकारावा अशी बादशहाची फारच इच्छा होती. व तो कधीं कधीं बिरबलासही ह्मणत असे कीं, बिरबल! आमचे येथें मेजवानीस एकदां ये.' परंतु प्रत्येक वेळीं बिरबल कांहीं तरी सबब सांगून ती वेळ काढून घेत असे.

एके दिवशीं बिरबल कांहीं महत्वाच्या कामांत अगदीं गर्क होऊन गेला आहे ही संधी साधून बिरबलास बादशहानें एकदम ह्मटलें " बिरबल उद्यां आमचे येथें मेजवानीस ये. " बिरबलास कामाच्या धांदलींत पुरतें भान न राहून " बरें आहे येईन. " असा जबाब त्याचेकडून होऊन चुकला. तो ऐकून बादशहास मोठा संतोष झाला व तें वर्तमान त्यानें काजी वगैरे सर्व दरबारी लोकांस कळवून उत्तम प्रकारें भोजनाचा थाट कर- ----- हुकूम फर्माविला. त्याप्रमाणें त्यांनीं यवनधर्मानुसार सर्व

मेजवानीचा थाट बनविला. ज्यांत नानाप्रकारच्या पशुपक्षादिकांच्या मांसाची व उत्तमप्रकारच्या मद्यांची चंगळच उडविली होती.

इकडे बिरबल घरीं आल्यावर मोठ्या विवंचनेंत पडला. कामाच्या धांदलींत भान न राहून आपण बादशहास ' जेवावयास येईन ' असें ह्मटलें. आतां न गेल्यास खोटें बोलण्याचा दोष येऊन बादशहाची मर्जी खप्पा होणार ! व जावें तर इतके दिवस संपादलेल्या कीर्तीस डाग लागून धर्मभ्रष्ट व्हावें लागणार ! तरी यास कोणती युक्ति शोधावी ! असा तो कांहीं वेळ विचार करीत बसला असतां त्याचे मनांत एकाएकीं एक युक्ति आली. तेणेंकरून त्याचें मन शांत होऊन तो स्वस्थपणें झोंपीं गेला.

दुसरे दिवशीं उजाडल्याबरोबर बादशहाकडून मेजवानीचें आमंत्रण आलें. त्याबरोबर बिरबलानें ' येतों. ' असा निरोप देऊन त्यास रवाना केलें. व आपण पोषाक वगैरे करून जवळील एके सोनाराचे दुकानीं जाऊन त्याचेपासून एक डुकराचे केंसांची कुंची मागून घेतली. ( ही कुंची सोनार लोकांस सोन्यामोत्यांचे डागिणे साफ करण्याकरितां लागत असते. ) ती घेऊन तो राजवाड्यांत दाखल झाला. त्यास पाहून काजी वगैरे सर्व लोकांस आनंद होऊन ते मनांत मांडे खाऊं लागले. नंतर सर्व तयारी आहे असें पाहून बिरबल बादशहास ह्मणाला " सरकार आपणाविषयीं कोणत्याही प्रकारें भिन्नभेद मनांत न आणितां आपल्या इच्छेनुरूप येथें आलों आहें. तरी आतां आमच्या रिवाजाप्रमाणें ह्या पात्रांवर पाणी शिंपडलें पाहिजे. व तसें करण्यास मला परवानगी द्यावी. तेव्हां बादशहा ह्मणाला ' ठीक

आहे. याबद्दल आह्मांकडून कोणतीही हरकत नाहीं. तुझ्या इच्छेनुरूप त्वां करावें.' बिरबलास तरी तेंच पाहिजे होतें. नंतर त्यानें हातांत उदकपात्र घेऊन जवळ असलेल्या कुंचीनें त्या सर्व पात्रांवर पाणी शिंपडलें. तें पाहून तेथें असलेले सर्व लोक अतिशय संतप्त झाले. ( कारण मुसलमानी धर्मांत असें आहे कीं, डुकराचें रक्त, मांस, हाड, केंस वगैरे यांचा संपर्क सेवन करणारास ते ज्ञातिभ्रष्ट करितात. ) मग त्यांनीं त्यास शिव्यांचा वर्षाव करून व धक्काबुक्की करून तेथून हांकून लाविलें. स्वतः बादशहाच्यानें कांहीं बोलवेना कारण त्यानें अगोदर सांगितलें होतें कीं, ' तूं करशील तें आह्मांस प्रमाण आहे. ' नंतर त्यांनीं तें सर्व अन्न टाकून दिलें. व नवें तयार करण्यास हुकूम केला.

---

## गोष्ट ८ वी.

( सावकाराचें व्याज. )

एके समयीं बादशहानें बिरबलास विचारलें कीं; ' ज्यास कधीं विश्रांति नसून अहोरात्र व दिवस चालत असतें असें काय ? बिरबलानें उत्तर केलें ' सावकाराचें व्याज. '

---

## गोष्ट ९ वी.

( दिल्लींतील कावळे. )

एके दिवशीं बादशहानें बिरबलास विचारलें:—

बाद०:—आपल्या ह्या दिल्ली शहरांत कावळे किती आहेत. तें सांग ?

बिरब०:—'महाराज आपल्या ह्या शहरांत आठ हजार दोनशें त्रेपन्न कावळे आहेत.'

बाद०:—'या रकमेंत कमी जास्त जाहले तर !

बिरबल०:—महाराज, आपणांस संशय येत असल्यास मोजून पहावेत. कमी झाल्यास कदाचित् परगांवीं गेले असतील व जास्त झाल्यास परगांवचे येथें आले असतील' हें बिरबलाचें समयोचित् भाषण ऐकून बादशहा खूष झाला.

---

## गोष्ट १० वी.

### (थोडें बहुत.)

एके दिवशीं बिरबलाची लहान पांच सहा वर्षांची मुलगी बिरबलाबरोबर कचेरीस आली होती. तिला बादशहानें प्रश्न केला:—'बेटा, तुला आमची भाषा बोलतां येते काय?' तेव्हां तिनें पटकन उत्तर केलें कीं, 'थोडी बहुत येते.' तें ऐकून बादशहा ह्मणाला:—थोडी बहुत येते ह्मणजे काय? तिनें उत्तर केलें:—ज्यांस चांगली येते, त्यांचेपेक्षां मला थोडी येते. व ज्यांस मुळींच बोलतां येत नाहीं, त्यांचेपेक्षां मला बहुत येते.

हें त्या मुलीचें चातुर्याचें भाषण ऐकून बादशहानें तिला एक बहु मोलाचा पोषाख बक्षीस दिला.

---

## गोष्ट ११ वी.

### (पदवी मिळविणें.)

दिल्ली शहरांत एक कुशाबा नांवाचा ब्राह्मण भिक्षुकी करून

राहत असे. परंतु त्यास नेहमीं असें वाटत असे कीं, लोकांनीं आपणास शास्त्री ह्मणावें. परंतु त्यास कांहींच विद्या अवगत नव्हती. तरी आपण बिरबलाजवळ गेल्यास आपली इच्छा पूर्ण होईल. असें जाणून एके दिवशीं बिरबल कचेरींतून परत येत आहे अशी संधी पाहिली, व रस्त्यांत त्याची गांठ घेऊन त्यास ह्मटलें " महाराज, मला कांहीं विद्या अवगत तर नाहींच परंतु मला लोकांनीं शास्त्री ह्मणावें अशी इच्छा आहे सबब आपणाजवळ आलों आहें. हें ऐकून बिरबल ह्मणाला " ठीक आहे. आतां असें कर कीं, जरा पुढें जाऊन तूं उभा रहा व जो कोणी तुला शास्त्री ह्मणेल त्यास मारावयास धांव. " हें ऐकून तो खुषी झाला व पुढें कांहीं अंतरावर जाऊन उभा राहिला. इकडे बिरबलानें कांहीं उनाड पोरें जमवून त्यांस कांहीं पैसे दिले व सांगितलें कीं, ' तो पुढें गृहस्थ उभा आहे त्यास शास्त्री शास्त्री असें ह्मणा व पळा. ' तें कबूल करून तीं पोरें त्या ठिकाणीं गेलीं व गलबा करून त्या ब्राह्मणास ' शास्त्री शास्त्री ' असें ह्मणूं लागलीं. तोही त्यांस मारावयास धांवूं लागला. तें पाहून रस्त्यावरील कांहीं टवाळखोर मंडळीही त्यास शास्त्री ह्मणूं लागले त्यांसही तो मारावयास धांवे. असें होतां होतां हा वेडा आहे व शास्त्री बोलल्यानें हा चिडतो असें जाणून दररोज टवाळखोर मंडळी त्यास शास्त्री ह्या नांवानें हांक मारीत व हा त्यांस मारावयास धांवे. अशा प्रकारें होतां होतां सर्वच लोक त्याला शास्त्री ह्मणूं लागले पुढें बिरबलाच्या सांगण्यावरून त्यानें चिडण्याचें सोडून दिलें व शास्त्री ही पदवी त्यास मिळाली.

## गोष्ट १२ वी.

( तीन प्रश्न—एक उत्तर. )

एके समयीं बादशहानें कचेरींतील लोकांस विचारलें कीं, '( १ ) विड्याचें पान कां सडलें. ( २ ) घोडा कां अडला आणि.( ३ ) भाकर कां करपली. या तीन प्रश्नांस एकच उत्तर द्या. तेव्हां कोणाच्यानेंही त्या तीन प्रश्नांस एकच उत्तर असें देववेना. असें पाहून बादशहानें बिरबलास विचारलें. बिरबलानें तावडतोब उत्तर केलें कीं, " न फिरविल्यानें " तें ऐकून बादशहा खूष झाला.

---

## गोष्ट १३ वी.

( कळीचा चुना. )

एके दिवशीं जेवण वगैरे आटोपून बिरबल आपल्या ओटीवर स्वस्थ बसला असतां त्यानें बादशहाचा एक खासगी नोकर धांवत धांवत जात आहे असें पाहिलें. तेव्हां त्यास हांक मारून विचारलें कीं, ' एवढ्या घांईनें कोठें जातोस ' त्यावर तो नोकर म्हणाला ' सरकारानीं मला दोन शेर कळीचा चुना आणावयास सांगितलें आहे तरी तो घेऊन जलदी गेलें पाहिजे. ' बिरबल मनांत विचार करूं लागला कीं, या वेळेस बादशहानें दोन शेर चुना मागविला, यांत कांहीं तरी गूढ आहे. त्यानें त्या नोकरास विचारलें:—' अरे, हा चुना कशाला पाहिजे हें तुला माहीत आहे काय? ' तो म्हणाला ' महाराज, मला गरिबाला तें काय ठाऊक! भोजनानंतर बादशहास त्यां पानास

विडा तयार करून दिला तो त्यांनीं खाऊन मला सांगितलें कीं, 'दोन शेर कळीचा चुना जलदी घेऊन ये.' हें त्याचें भाषण ऐकून बिरबल त्यास ह्मणाला कीं, 'तुझीं शंभर वर्षें भरलीं, आतां बादशहा तो दोन शेर चुना तुजकडून जुलमानें खावबील आणि तूं मरशील. कारण बादशहास त्वां जो विडा तयार करून दिला, त्यास चुना फार होऊन त्याचें तोंड भाजलें असावें व त्याबद्दल ही शिक्षा त्यानें तुला देण्याची योजिली आहे. तरी आतां असें कर कीं, एक शेर चुना व एक शेर लोणी हीं दोन्हीं एकत्र करून बादशहाकडे घेऊन जा. ह्मणजे त्यापासून तुला कांहीं इजा होणार नाहीं.' त्या चाकरानें बिरबलाच्या सांगितल्याप्रमाणें केलें, व तो चुना ह्मणून बादशहाजवळ नेला; तेव्हां बादशहानें त्याचेजवळून तो सर्व खावविला. व तेणेंकरून त्यास अतिशय इजा होऊन तो खास मरणार असें बादशहास वाटलें होतें. परंतु दुसरे दिवशीं उजाडल्याबरोबर तो नोकरीवर हजर आहे हें पाहून बादशहास मोठें आश्चर्य वाटलें.

आपण केलेला विचार निष्फळ होऊन हा नोकर कांहीं एक इजा न होतां जिवंत राहिला हें पाहून बादशहाचे मनास खाऊं लागलें. तरी त्याचा कोणत्याही प्रकारानें नाश करावा असा विचार करून त्यानें एका लोणाऱ्यास बोलावून आणून गपचूप रीतीनें सांगितलें कीं, उद्यां सकाळीं जो मनुष्य तुजकडे प्रथम मी पाठवीन त्यास त्वां भट्टींत टाकून जाळावें. दुसऱ्या दिवशीं उजाडल्याबरोबर बादशहानें त्या नोकरास हुकूम केला कीं, 'अमुक लोणाऱ्याकडे जाऊन पांच शेर चुना घेऊन ये. तेव्हां

ती नोकर जातां जातां बिरबलास भेटला. व त्यास त्यानें बादशहाचा हुकूम सांगितला. तेव्हां बिरबल मनांत समजला कीं, ह्याचे जवळून बादशहानें चुना खावविला परंतु त्यापासून कांहीं इजा न होतां हा जिवंत आहे याकरितां बादशहानें याचा नाश करण्याकरितां आज लोणाऱ्याकडे जावयास सांगितलें आहे. मग बिरबलास त्या नोकराची दया येऊन त्यास सांगितलें कीं, पंधरा मिनिटें येथें स्वस्थ बसून रहा. आणि मग त्या लोणाऱ्याकडे जाऊन चुना घेऊन बादशहाकडे जा.

इकडे बादशहानें या नोकरास लोणाऱ्याकडे जावयास सांगितल्यावर कांहीं वेळानें दुसऱ्या एका नोकरास त्याची कशी काय व्यवस्था होते तें पहाण्याकरितां पाठविलें तो थेट त्या लोणाऱ्याच्या घरीं येऊन पोहोंचला. पहिला चाकर बिरबलाचे घरीं गेल्यामुळें राहून दुसरा पुढें गेला. तो जातांच लोणारी यानें त्यास उचलून एकदम भट्टींत टाकून दिला, व कांहीं वेळानें त्याची खाक बनून राहिली. पहिला चाकर बिरबलाच्या सांगण्याप्रमाणें पंधरा मिनिटें थांबून लोणाऱ्यांचे घरीं गेला व तेथून चुना घेऊन बादशहाजवळ आणून हजीर केला. त्यास पाहून बादशहा ह्मणाला ‘ अरे, येथून गेल्यावर वाटेंत दुसऱ्या कोणत्या ठिकाणीं गेला होतास कीं काय; तेव्हां तो चाकर ह्मणाला—महाराज, वाटेंत बिरबलाचें घर आहे तेथून जातांना बिरबल दारांतच उभे होते, त्यांनीं हांक मारिली सबब त्यांच्या येथें गेलों होतों. बादशहा ह्मणाला ‘ त्यानें तुला बोलावून काय विचारलें ?’ चाकर ह्मणाला—मला विचारलें कीं, सरकार स्वारी यविळेस काय

करीत आहे? तेव्हां मी ह्मटलें कीं, 'घडा घ्यावयास बसले आहेत' इतकें सांगून मी त्यांचा निरोप घेतला आणि आपल्या हुकुमाप्रमाणें लोणारी याचे येथून हा चुना घेऊन आलों. हें ऐकून बादशहा मनांत ह्मणाला ह्मास बिरबलाचें साह्य असल्यानें हा जिवंत राहिला. व बिरबलापुढें आपलें शहाणपण चालणार नाहीं असें समजून तो स्वस्थ राहिला.

---

## गोष्ट १४ वी.

### ( झक् मारणें. )

एके दिवशीं बिरबल आणि बादशहा सहल करितां करितां नदीकिनारीं आले. तेथें कांहीं कोळी लोक जाळीं टाकून मासे धरीत होते, तें पाहून बादशहाचे मनांत आलें कीं, आपणही आज माशांची शिकार करावी. मग तो मासे पकडण्याच्या उद्योगांत रमला हें पाहून बिरबलास कांहीं जरूरीच्या कामाकरितां जावयाचें होतें ह्मणून तो बादशहाची रजा घेऊन परत राजवाड्याकडे आला. त्यास राणीनें विचारलें कीं, बादशहा कोठें आहेत? 'तेव्हां बिरबलानें उत्तर दिलें कीं, 'झक् मारीत आहेत.' हें ऐकून राणीस फारच राग आला तरी तिनें तो राग बाहेर न दाखवितां बादशहाजवळून आपण याची खोड तोडवूं असें मनांत ह्मणाली. पुढें संध्याकाळीं जेव्हां बादशहा घरीं आला तेव्हां तिनें त्यास सांगितलें कीं, अलीकडे बिरबल फार शेफारला आहे. मघां मी त्यास विचारलें कीं, बादशहा कोठें आहेत? तेव्हां त्यानें ह्मटलें कीं, बादशहा झक् मारीत आहेत.

तरी अशा उन्मत्त मनुष्यास चांगलीच शिक्षा दिली पाहिजे. हें भाषण ऐकून बादशहाही क्रोधायमान झाला व त्यानें तावडतोब बिरबलास आपलेजवळ बोलाविलें व त्यास ह्मटलें कीं,' बिरबल अलीकडे तूं फार उद्धट झाला आहेस. असें तुझ्या वर्तनावरून दिसून येतें कारण मघां जेव्हां राणीनें तुला मी कोठें ह्मणून विचारलें तेव्हां तूं 'झक् मारीत आहेत' असें सांगितलेंस तरी आतां तुझ्या या वर्तनाला कडक शिक्षा योग्य आहे. हें ऐकून बिरबल ह्मणाला महाराज, अपराधाची क्षमा असावी. मी मघां जें कांहीं ह्मटलें तें खोटें नव्हतें कारण आपण त्यावेळेस मासे मारीत होतां. आतां झक् या शब्दाचा अर्थ मासा असा आहे तें ऐकून बादशहा व राणी खूष झालीं.

## गोष्ट १५ वी.

### ( बनावट हिरा. )

एके दिवशीं एक वृद्ध गृहस्थ बिरबलाजवळ येऊन ह्मणाला कीं, ' महाराज, मी एक कारागीर आहें परंतु सध्यां वृद्धापकाळामुळें माझ्यानें कांहीं अतिशय मेहनतीचें काम होत नाहीं व माझा एकुलता एक मुलगा सुमारें पंधरा दिवसांपूर्वी मरण पावला. तो असतांना मला कोठल्याही गोष्टीची कमताई नव्हती. परंतु आतां मी लाचार होऊन आपणापाशीं आलों आहें तरी आपण समर्थ आहां. ' तें ऐकून बिरबलानें त्यास कांहीं रुपये देऊन सांगितलें कीं, ' सध्यां खर्चापुरते हे रुपये तुह्मी घ्या व त्याच्याजवळ ( एक सडीसाखरेचा खडा देऊन त्यास ह्मटलें

कीं, ) आपण कारागीर ह्मणवितां तरी ह्या खडीसाखरेच्या खड्यास घासून जणुं काय हिराच असा बनवून आणा.' त्यावर 'बरें आहे चार दिवसांचें आंत हा खडा घेऊन येईन' असें ह्मणून तो निघून गेला. नंतर चौथे दिवशीं तो कारागीर तो खडीसाखरेचा बनावट हिरा बिरबलाजवळ घेऊन आला. तें त्याचें कसब पाहून बिरबल खुषी होऊन ह्मणाला कीं, आतां मी हा खडा बादशहाजवळ घेऊन जातों तेथें तुह्मीही चला.' तेथें गेल्यावर बादशहा स्नान करीत आहे ही संधी पाहून बिरबलानें त्या कारागिरास बाहेर बसवून आपण बादशहाजवळ गेला. त्यास पाहून बादशहा ह्मणाला 'बिरबला, कां आलास काय काम आहे? बिरबल ह्मणाला-सरकार. एका जवाहिरानें हा एक उत्तम हिरा आणिला आहे व तो आपणास शोभणारा आहे असें पाहून त्यास मी आपणाजवळ आणिलें आहे.' बादशहानें तो हिरा आपल्या हातांत घेऊन ह्मटलें 'ठीक आहे. त्यास बारा वाजतां दरबारांत येण्यास सांग.' बिरबलानें त्या वृद्धास तो निरोप कळवून जाण्याविषयीं इशारत केली व तो निघून गेला. नंतर बादशहा बिरबलास ह्मणाला-'हा हिरा सध्यां तुजजवळ ठेव. तेव्हां बिरबल ह्मणाला-सरकार, मला सध्यां कांहीं घाईच्या कामाकरितां जावयाचें आहे, व तेथें उशीर लागल्यास हा हिरा मजजवळ राहून जाईल तरी आपणाजवळच असूं द्यावा.' मग बादशहानें तो हिरा कनवटीस खोंविला. व बिरबल निघून गेला.

दरबार भरल्यावर बारा वाजण्याचे सुमारास तो वृद्ध गृहस्थ

आला तेव्हां बिरबलानें तो आल्याची वर्दी दिली हा वेळ पर्यंत बादशहास त्या हिऱ्याची आठवण नव्हती. व तो साखरेचा खडा असल्यामुळें पार वितळून त्याचा मागमूस नाहींसा झाला होता. तो गृहस्थ आल्याची वर्दी जेव्हां बादशहास बिरबलाकडून मिळाली त्यावेळेस बादशहा ह्मणाला ' बिरबल, तो हिरा मी तुजजवळ दिला होता काय ? '

बिरबल०—नाहीं सरकार आपणच आपणाजवळ ठेविलात.

बाद०—'तर माझ्या स्नान करण्याच्या खोलींत जाऊन तो हिरा कोठें पडला असल्यास पहा. ' बिरबलानें जाऊन पुष्कळ चौकशी केली परंतु तो हिरा कोठून सांपडणार! मग तो बादशहाजवळ येऊन ह्मणाला सरकार, मी पुष्कळ चौकशी केली परंतु त्या हिऱ्याचा कोठें पत्ता लागत नाहीं. तें ऐकून बादशहानें त्या वृद्ध गृहस्थास विचारलें कीं, तुझ्या हिऱ्याची किंमत किती आहे तें सांग. तेव्हां बिरबलानें घरीं त्यास पूर्वीच सांगून ठेविल्याप्रमाणें तो पटकन ह्मणाला कीं; महाराज, माझ्या हिऱ्याची किंमत तीन हजार रुपये इराणच्या बादशहानें केली होती परंतु ती किंमत मला न पटल्यामुळें मी आपणाजवळ आलों आहें.

बाद०—तरी आतां तुला त्याची किती किंमत मिळावी असें वाटतें.

कारागीर०—सरकार, मला त्याची पांच हजार रुपये किंमत आली पाहिजे.

तें ऐकून बादशहानें त्यास पांच हजार रुपये देऊन वाटेस लाविलें.

# गोष्ट १६ वी.

## ( ओ वी गया और ओ वी गया. )

एके वेळीं असें झालें कीं, एक गृहस्थ एका काजीजवळ आपली पांच हजार रुपयांची जिनगी ठेवून देशांतरीं गेला. पुढें तेथून तो परत आल्यावर त्या काजीजवळ आपली ठेव मागूं लागला परंतु काजी नाकबूल होऊन जसें कांहीं आपणांस ठाऊकच नाहीं असें करूं लागला. तेव्हां तो गृहस्थ बिरबलाजवळ जाऊन आपली सर्व हकीगत त्यास सांगून ह्मणाला कीं, महाराज, आपण मजवर दया करून माझी ठेव त्या काजीकडून परत येईल असें केल्यास मजवर मोठे उपकार होतील. बिरबलानें ह्मटलें ठीक आहे. मी युक्ति करून तुझी ठेव परत येईल असें करितों. परंतु ह्या विषयीं कोणाजवळही ब्र काढूं नको.

दुसरे दिवशीं बिरबलानें त्या काजीस घरीं बोलावून सांगितलें कीं, ' काजी, मला सध्यां कांहीं कामाकरितां दूरदेशीं जावयाचें आहे तरी तेथें मला तीन चार महिने रहावें लागेल व माझ्या बदली आपली नेमणूक करावी अशी माझी इच्छा आहे ह्मणून आपण मला उद्यां संध्याकाळीं येऊन भेटा ह्मणजे मी बादशहाचा विचार घेऊन तुह्मांस सर्व कांहीं खुलासा सांगेन. नंतर तो काजी ठीक आहे असें ह्मणून निघून गेला.

तो निघून गेल्यावर बिरबलानें त्या गृहस्थास बोलावून आपून सांगितलें कीं, उद्यां सकाळींच जाऊन तूं काजीजवळली आपली ठेव माग ह्मणजे तो तुला कांहीं न बोलतां देईल. बिरबला-

च्या सांगण्याप्रमाणें तो गृहस्थ काजीजवळ जाऊन आपली ठेव मागूं लागला. तेव्हां तो काजी ह्मणाला 'अरे हो! तुझ्या ठेवीबाबद मला विस्मृति झाली होती परंतु काल रात्रीं मला एकाएकीं आठवण झाली. तूं आज आलास ह्मणून बरें झालें नाहींतर मी तुला आतांच बोलावण्याकरितां मनुष्य पाठविणार होतों. इतकें बोलून त्यानें त्याची ठेवलेली सर्व जिनगी ताब्यांत केली. ती घेऊन तो गृहस्थ आपल्या घरीं निमुटपणें गेला.

संध्याकाळीं तो काजी बिरबलाचे घरीं गेला व कसें काय केलेंत ह्मणून विचारूं लागला. त्यावर बिरबल ह्मणाला--सध्यां कांहीं कारणामुळें माझें जाणें रहित झालें आहे पुढें माझा निश्चय झाल्यावर आपणास कळवीन. तें ऐकून तो काजी मनांत तडफड-त तडफडत घरीं आला व ह्मणूं लागला कीं, ओ बी गया और ओ बी गया.

---

## गोष्ट १७ वी.

### ( कुभांडखोर बाई. )

दिल्ली शहरांत एक कुभांडखोर बाई रहात होती. तिचा व तिच्या शेजारणीचा कांहीं कारणावरून एके दिवशीं मोठा तंटा झाला त्याचा सूड उगवावा ह्मणून त्या अवदसेनें आपलें स्वतःचें मूल मारून 'माझें मूल शेजारणीनें मारलें, अशी ओरड करून सरकाराकडे फिर्याद नेली.

दरबारांत आल्यावर न्यायासनीं बिरबल बसला होता. त्यानें त्या शेजारीणबाईस विचारलें तेव्हां तिनें ती गोष्ट नाकबूल के-

ली. नंतर बिरबलानें त्या कुमांडी स्त्रीस बाहेर घेऊन जाण्याचा हुकूम केला. व ह्या आळ आलेल्या स्त्रीस सांगितलें कीं, जर त्वां त्या बाईचें मूल मारलें नाहींस हें खरें आहे तर तूं सर्व कचेरीचे समक्ष नग्न होऊन उभी रहा. तें ऐकून ती बाई ह्मणाली माझा जीव गेला तरी बेहत्तर आहे, परंतु आपण सांगतां हें कृत्य माझ्या हातून होणार नाहीं. मग बिरबलानें त्या स्त्रीस बाहेर नेऊन त्या कुमांडी बाईस आंत आणविलें. व तीस ह्मटलें कीं, जर तुझें मूल शेजारीणबाईनें मारलें हें खचित आहे तर तूं ह्या सर्व मंडळीसमक्ष नग्न होऊन उभी रहा. तें तिनें ताबडतोब कबूल करून त्याप्रमाणें करण्यास तत्पर झाली. हें तिचें आचरण पाहून तात्काळ शिपायास हुकूम देऊन तीस बराच मार देवविला. त्यासरसें तिनें ती सर्व गोष्ट कबूल केली. तें पाहून बादशहास फार संताप आला. व त्यानें तीस जिवंत जाळून टाकण्याचा हुकूम केला व त्या शेजारीणबाईचा मोठा सन्मान करून तीस रवाना केलें.

---

## गोष्ट १८ वी.

### ( शिक्षे ऐवजीं बक्षीस. )

दिल्ली शहरांत एक गृहस्थ रहात असे. त्याच्याविषयीं लोकांत अशी दाट अफवा असे कीं, त्याचें तोंड जो सकाळींच पाहील त्यास अन्न मिळत नाहीं. ही गोष्ट बादशहाच्या कानापर्यंत गेली. व या गोष्टीची प्रचिती आपण स्वतः घेऊन पहावी असें बादशहाच्या मनांत येऊन त्यानें त्या गृहस्थास पकडून

आणून अटकेंत ठेविलें व दुसरे दिवशीं उजाडल्याबरोबर उठून त्याचें प्रथमच तोंड पाहिलें. व मनांत ह्मणाला कीं, याची प्रचीती काय आहे ती पाहूं.

जेवणाची वेळ होऊन बादशहा जेवावयास बसणार तों त्याच्या ताटांत वरून एक पाल पडली, तेव्हां तो तें अन्न टाकून उठला व ' आपण त्या मनुष्याचें तोंड पाहिलें ह्मणूनच असें झालें, असें पक्कें समजून त्यानें त्या मनुष्यास एकदम सुळीं द्यावें असा हुकूम फर्माविला. ही बातमी जेव्हां बिरबलास कळली तेव्हां त्या मनुष्याची त्यास दया येऊन त्यानें त्याची गांठ घेऊन सांगितलें कीं, तूं भिऊं नको, ज्यावेळीं तुला वधस्थानीं नेऊन वधण्याच्या वेळेस ' तुझी इच्छा काय आहे ' असें विचारतील त्यावेळेस तूं इतकेंच सांग कीं, ' माझें तोंड पाहून लोकांस काय तें अन्नच खावयास मिळत नाहीं परंतु मी आज बादशहाचें तोंड पाहिलें ह्मणून मला सुळीं जाण्याची पाळी आली आहे. तरी लोकांनीं बादशहाचें तोंड न पहाण्याविषयीं खबरदारी ठेवावी. इतकेंच सांगणें आहे.

मग जेव्हां सेवकांनीं त्यास वधस्थानीं नेलें. तेव्हां त्यास ' तुझी काय इच्छा आहे ? ' असें विचारिलें. त्यानें बिरबलाच्या सांगीप्रमाणें उत्तर दिलें. तें सेवकांनीं ऐकून बादशहास कळविलें तें ऐकून बादशहा खिन्न होऊन त्यानें त्या गृहस्थास सोडून देऊन त्यास कांहीं द्रव्य दिलें व सांगितलें कीं, अशी गोष्ट तूं पुन्हां कोणाजवळ बोलूं नको.

## गोष्ट १९ वी.

### ( हेतु सांगणें. )

एके दिवशीं बादशहानें बिरबलास ह्मटलें कीं, बिरबल, त्वां एकदां सर्व लोकांच्या मनांतील हेतू सांगितला होतास तरी आतां माझ्या मनांत काय आहे तें सांग. तें ऐकून बिरबल हजर जबाबीच होता. त्यानें पट्कन उत्तर दिलें कीं. सरकार, तुमच्या मनांत असें आहे कीं, तुमचे पितर स्वर्गास जावे. हें समयोचित् भाषण ऐकून बादशहा खूष झाला.

---

## गोष्ट २० वी.

### ( चोरी पकडणें. )

दिल्ली शहरांत एक मोठा सावकार रहात असे. तो एके दिवशीं स्नानास बसला असतां त्यानें आपल्या गळ्यांतील अमोल्य हार काढून खुंटीस लाविला होता स्नान करून उठल्यावर तो हार परत आपल्या गळ्यांत घालण्याची त्यास आठवण न राहून तेथेंच राहिला. हें त्याच्या एका नोकरानें पाहून तो त्यानें छपवून ठेविला. जेव्हां सावकारास त्या हाराची आठवण झाली. तेव्हां त्यानें पुष्कळ चौकशी करून आपल्या सर्व नोकरांसही विचारिलें. परंतु कोणीही कबूल होईना. तेव्हां त्यानें आपल्या सर्व नोकरांस सरकरच्या ताब्यांत चौकशी करतां दिलें. मग बिरबलानें प्रत्येकास सारख्या मापाची एक एक काठी देऊन सांगितलें कीं, ही काठी तुह्मी प्रत्येकजण आपल्याजवळ एक

रात्र ठेवा व उद्यां मजकडे घेऊन या. आतां ज्यानें हार चोरिला असेल त्याची काठी चार बोटें लांब वाढेल. इतकें सांगून त्यास रवाना केलें.

इकडे ते नोकर घरीं आल्यावर ज्यानें हार चोरिला होता, त्यानें आपली काठी चार बोटें कापून ठेविली. दुसरे दिवशीं ते सर्वजण आपापल्या काठ्या घेऊन हजर झाले. तेव्हां ज्यानें हार चोरिला होता त्याची काठी चार बोटें तोकडी पाहून बिरबलानें तो चोर असें ओळखून त्यास सेवकांकडून मार देवविला. तेव्हां त्यानें कबूल होऊन तो हार हजीर केला.

## गोष्ट २१ वी.

### ( तहनामा. )

बिरबलाचें दिवसेंदिवस दरबारांत जास्त वजन पडूं लागलें हें पाहून त्याच्या प्रतिस्पर्धी यवनलोकांस फारच वाईट वाटूं लागलें, परंतु त्याच्यापुढें त्यांचा कांहींच इलाज चालेना. त्याचा कोणत्या तरी रीतीनें अपमान करावा ह्मणून ते विचार करीत होते. परंतु त्याच्या समक्ष त्याचा अपमान करण्याची कोणाचीही छाती नव्हती. ह्मणून कांहीं लोकांनीं त्याच्या नांवाचा एक अगदीं बिभत्स लेख लिहून तो एका प्रसिद्ध ठिकाणावर लावला. थोडक्याच वेळांत त्या कृत्याचा जिकडे तिकडे मोठा गवगवा होऊन गेला व ही गोष्ट बिरबलासही त्याच्या हितचिंतकांनीं सांगितली, ह्मणून हें आहे तरी काय तें पहाण्याकरितां बिरबल तेथें स्वतः गेला. त्यानें तो जाहिरनामा वाचून पाहतां लोकांच्या धाडसाचें मोठें आश्चर्य वा-

टलें. मग त्यानें अशी, कांहीं विलक्षण खुबी केली कीं, तो जाहीरनामा थोडा उंच लाविला असल्यामुळें सर्वांस चांगलेपणीं वाचतां येत नसे, सबब आपल्या चाकराकडून तेथून काढून अमळ खालीं चिकटविला. व तेथें असलेल्या लोकांस हांक मारून ह्मणाला कीं, 'ऐकाहो नागरीक लोकांनो आजपासून आमचा व आमच्या नागरीक लोकांचा तहनामा ठरला आहे तो असा कीं, लोकांनीं इच्छेस येईल तसें आमच्याशीं वागावें. व आह्मीही आमच्या इच्छेस येईल तसें वर्तन ठेवावें. यांत कायद्याचा अडथळा मुळींच मनांत आणावयाचा नाहीं.

असे त्याचे शब्द ऐकतांच सर्वांस विलक्षण दहशत बसून राहिली.

---

## गोष्ट २२ वी.

### ( झाडाची साक्ष. )

एका मनुष्यानें एका वृद्धाजवळ आपली पांचशें रुपयांची ठेव ठेवण्यास दिली. पुढें कांहीं दिवसांनीं तो ती परत मागूं लागला. तव्हा तो वृद्ध नाकबूल झाला. मग ती फिर्याद बिरबलाकडे आली. बिरबलानें त्या वृद्धास बोलावून ठेवीबाबद विचारलें परंतु तो शपथ वाहून ह्मणाला कीं, मला कांहीं माहीत नाहीं. त्यावर तो मनुष्य ह्मणाला—'महाराज, हा वृद्ध खोडसाळ आहे. याचे शपथेचें कांहीं प्रमाण नाहीं.' पुढें बिरबलानें त्या फिर्यादीस विचारलें कीं, या वृद्धाजवळ त्वां ठेव दिली त्या वेळेचा कोणी साक्षी आहे काय? फिर्यादी ह्मणाला 'महाराज, साक्षी वगैरे कोणी नाहीं.

एका आंब्याचे झाडाखालीं मी ह्या ह्मातान्यास रुपये दिले तेथें कोण असणार!' बिरबल ह्मणाला 'वः तर मग साक्षी वगैरे कोणी नाहींत असें कां ह्मणतोस. तें झाड तुझी साक्ष देईल. जा त्या झाडास माझा निरोप सांग. आणि तें न येईल तर हें समान त्यास दे. ह्मणजे तें झाड येऊन तुझी साक्ष देईल.' फिर्यादीस हें बिरबलाचें बोलणें खरें वाटलें नाहीं तथापि त्याच्या आज्ञेस्तव तो समान घेऊन गेला. कांहीं वेळ गेल्यावर बिरबलानें उतावीळ होऊन त्या वृद्धास विचारलें कीं, ' तो फिर्यादी त्या झाडाजवळ गेला असेल काय? ' तेव्हां तो वृद्ध ह्मणाला ' महाराज अजून तो पोंचला नसेल, कारण तें झाड दूर अडचणींत आहे तिकडून येण्यास वेळ लागेल.

कांहीं वेळानें फिर्यादी परत आला, व ह्मणाला कीं, महाराज म्यां झाडास निरोप सांगून समानही दिलें. परंतु तें कांहीं बोलत चालत नाहीं ह्मणून मी परत आलों बिरबल त्यास ह्मणाला ' तुझ्या पाठीमागें झाड येथें येऊन काय खरा मजकूर होता तो सांगून परत गेलें.' तें ऐकून तो वृद्ध ह्मणाला ' महाराज तुह्मी खोटें सांगतां मी येथेंच बसलेला आहें, झाड येथें आलें असतें तर मला दिसलें असतें. बिरबल ह्मणाला " अरे लबाड मनुष्या, जरी झाड येथें प्रत्यक्ष आलें नाहीं तरी फिर्यादीनें तुझ्याजवळ ठेव ठेवण्याकरितां दिली इतकी साक्ष त्या झाडाकडून मिळाली. तुला तें झाड माहीत नसतें तर मी तुला प्रश्न केला तेव्हां ' तें झाड दूर अडचणींत आहे असें तूं कसें बोलतोस?" या बोलण्यावर तो वृद्ध खुंटीत होऊन त्यानें सर्व गोष्ट कबूल केली.

# गोष्ट २३ वी.

## ( चिलखताची परिक्षा. )

एके वेळीं बादशहानें एका लोहारास ' एक चांगलें चिलखत तयार करून आण ' असें सांगितलें. तें तयार झाल्यावर तो लोहार बादशहाकडे आला. बादशहानें तें जमीनीवर ठेवून त्यावर वार केला. तों त्याचे दोन तुकडे झाले. त्यावरून बादशहानें लोहारास सांगितलें कीं, जर अशीं चिलखतें तूं पुन्हां तयार करशील तर तुझा शिरच्छेद करीन. तें ऐकून तो लोहार फारच भयाभीत होऊन घरीं गेला. दुसरे दिवशीं सकाळींच उठून तो बिरबलाचे घरीं गेला व झालेलें सर्व वर्तमान सांगन ह्मणाला कीं, ' मला कांहीं तरी युक्ति सांगून यांतून बचवा. ' बिरबलास त्याची दया येऊन त्यानें त्यास सांगितलें कीं, ' तूं एक चांगलें चिलखत तयार कर आणि आंगांत घालून बादशहाकडे पसंतीला ने ह्मणजे सर्व ठीक होईल. '

दोन चार दिवसांनीं त्या लोहारानें एक चिलखत तयार करून तें आपल्या आंगांत घालून बादशहाकडे नेलें तेव्हां बादशहानें तें त्यास जमीनीवर ठेवावयास सांगितलें परंतु त्या लोहारानें बादशहास ह्मटलें कीं, ' महाराज चिलखत आंगावर असतांच त्याची परीक्षा पाहण्याची चाल आहे. ह्मणून मी तें स्वत आंगांत घातलें आहे. ' तें ऐकून बादशहा खुषींत झाला व त्यानें त्यास चांगलें बक्षीस दिलें.

## गोष्ट २४ वी.

( स्वप्नाचा अर्थ. )

एके दिवशीं रात्रीं बादशहाला असें स्वप्न पडलें कीं, आपले सर्व दांत पडले. या स्वप्नाचा अर्थ समजावा म्हणून उजाडल्या बरोबर त्यानें बिरबलास बोलावणें पाठविलें परंतु कांहीं कारणामुळें बिरबल बाहेर गेला होता, म्हणून त्याची गांठ पडली नाहीं मग बादशहानें एका काजीस बोलावून त्याचा अर्थ विचारला तेव्हां त्यानें म्हटलें ' सरकार या स्वप्नाचा अर्थ इतकाच कीं, तुमच्या मुलांमाणसांस तुमच्यासमक्ष मृत्यु येईल. ' हें ऐकून बादशहास मोठा राग येऊन त्यानें त्या काजीस कडक शिक्षा करण्याचा हुकूम केला.

कांहीं वेळानें बिरबल आला त्यासही बादशहानें त्या स्वप्नाचा अर्थ विचारिला त्यानें सांगितलें 'महाराज, आपलीं मुलेंमाणसें या सर्वांपेक्षां आपणांस पुष्कळ आयुष्य आहे. ' ह्या त्याच्या बोलण्यावरून बादशहा खूप होऊन त्यास मोठें बक्षीसही दिलें.

---

## गोष्ट २५ वी.

( घेणाराचा हात वर. )

एके दिवशीं बादशहानें बिरबलास म्हटलें कीं, बिरबल, आपल्या पहाण्यांत नेहमीं असें येतें कीं, ' देणाराचा हात वर व घेणाराचा हात खालीं असतो, तरी याच्या विरुद्ध गोष्ट केव्हां असते ?

बिरबलः—सरकार, तपकीर देण्याच्यावेळीं देणाराचा हात

खालीं. व घेणाराचा हात वर असें असतें. तें ऐकून बिरबलाच्या शहाणपणाविषयीं बादशहाची खात्री झाली.

---

## गोष्ट २६ वी.

( बादशहाच्या विहिरीचें लग्न. )

एके दिवशीं बिरबल कांहीं कारणामुळें रुसून बादशहाच्या नकळत कोणाएका खेडेगांवीं जाऊन राहिला. तो गेल्यावर बादशहास वारंवार पंचाईत पडूं लागली. त्यानें त्याची पुष्कळ चौकशी केली. परंतु तो कोठें आहे याचें त्यास निदान बांधतां येईना. शेवटीं बादशहानें मनांत एक युक्ति योजून गांवोगांवीं पाटील कुळकर्णी व अधिकारी लोकांस असा हुकूम पाठविला कीं, ' दिल्ली शहरांत बादशहाच्या विहिरीचें लग्न अमुक तिथीस नेमिलें आहे तरी सर्वांनीं आपापल्या विहिरी घेऊन त्या समारंभाचे वेळेस दिल्ली शहरांत हजर व्हावें. ' हा बादशहाचा चमत्कारिक हुकूम ऐकून गांवोगांवच्या लोकांस चमत्कार वाटला.

ज्या गांवांत बिरबल लपून होता, त्या गांवांतही तो हुकूम येऊन पोहोंचल्यावर तेथील अधिकारी कांहीं लोक जमवून ह्या गोष्टीचा विचार करीत बसला होता, इतक्यांत बिरबल तेथें येऊन पोहोंचला. व त्यानें त्या अधिकाऱ्यास लोक जमविण्याचें कारण विचारलें. तें कारण समजल्यावर बिरबलानें त्यांस सांगितलें कीं, यांत विचार करण्यासारखं कांहींच नाहीं. तुह्मी सर्व लोक मिळून दिल्ली शहरच्या आसपास मैदानांत जाऊन तंबू ठोका. व बादशहास असा निरोप पाठवा कीं, आह्मी आपल्या

विहिरी घेऊन आलों आहों, तरी सरकारची विहीर पांच पावलें आमच्या विहिरीचें आगतस्वागत करण्याकरितां आमच्या तंदूपर्यंत यावी. बिरबलानें त्या अधिकाऱ्यास आणखी असें सांगितलें कीं, ही गोष्ट म्यां तुला सांगितली हें बादशहास न कळविण्याविषयीं मात्र खबरदारी ठेव.

नंतर बिरबलाच्या सांगण्याप्रमाणें आसपासचे कांहीं पाटील, कुळकर्णी दिल्ली शहराबाहेरील मैदानांत येऊन त्यांनीं तेथें आपला तळ दिला. व बादशहास जो निरोप पाठविण्याचा तो पाठविला.- नंतर बादशहानें ज्या अधिकाऱ्याच्या मार्फत निरोप अला, त्या अधिकाऱ्यास बोलावून त्यास सर्व हकीगत विचारिली. तेव्हां त्या अधिकाऱ्यानें पुष्कळ आढेवेढे घेऊन सर्व गोष्ट कबूल केली. मग बादशहानें बिरबलास मोठ्या इतमामानें मिरवीत दिल्ली शहरांत आणविलें.

---

## गोष्ट २७ वी.

### ( निमकहालाल व निमकहराम. )

एके दिवशीं बादशहानें बिरबलास विचारलें कीं, सर्वांत निमकहलाल कोण? व निमकहराम कोण आहे? तें सांग. तेव्हां बिरबल ह्मणाला कीं, महाराज, खरा निमकहलाल असा कुत्रा आहे. कारण त्यास तुह्मी खाण्यास घाला अगर न घाला तरी तो धन्याची चाकरी करण्यास कधींही अंतर पाडणार नाहीं. आतां निमकहराम विचाराल तर जांवई हा आहे. त्यास कितीही दिलें तरी त्याची तृप्ती न होतां एक रति किंवा एक काडी क-

मती झाल्यास तो सासऱ्यास निंदत असतो. ह्मटलेंच आहे कीं:—

॥ जामातो कृष्णसर्पस्य पावको दुर्जन स्तथा ॥

॥ उपकारो न जानाति पंचमो भगिनी सुतः ॥

हें ऐकून बादशहा खूष होऊन स्वस्थ राहिला.

---

## गोष्ट २८ वी.

### ( सोन्याचा सूळ. )

एके दिवशीं बादशहाच्या मनांत असें आलें कीं: जांवई तितके निमकहराम ह्मणून आपल्या शहरांत अशीं निमहरान माणसें ठेवणें रास्त नाहीं. ह्मणून त्यानें बिरबलास हुकूम केला कीं: आपल्या राज्यांतिल सर्व जांवयांस एकदम सुळीं द्यावें. बिरबलानें 'ठीक आहे' असें ह्मणून त्या कृत्याकरितां एक लक्ष रुपये मागून घेतले, व बादशहास सांगितलें कीं, आजपासून आठवे दिवशीं सर्व जांवयांस सुळीं देऊं. नंतर त्यानें शहराबाहिरील मैदानांत पुष्कळशी जागा पाहून तेथें सुमारें दोन चार हजार सूळ रोंवून ठेविले. त्यांत एक सोन्याचा, एक रुप्याचा, दोन चार तांब्याचे, व बाकीचे लोखंडाचे असे होते.

नियमित दिवसाच्या अगोदर एक दिवस बिरबल बादशहास घेऊन त्या ठिकाणीं आला. तेव्हां बादशहानें तो सोन्याचा रुप्याचा वगैरे सूळ पाहून बिरबलास विचारलें कीं, 'बिरबल, अरे हा सोन्याचा सूळ कोणाकरितां केलास? बिरबल हात जोडून ह्मणाला—' सरकार, अपराधाची क्षमा असावी. हा सोन्याचा, सूळ तुह्मांकरितां आहे. कारण तुह्मीही आपल्या सासऱ्याचे जां-

वर्ड आहांत. तसेंच मी तुमचा दुय्यम प्रधान असल्यामुळें हा रुप्याचा सूळ मजकरितां आहे. व बाकीचे सर्व सूळ त्याच्या त्याच्या मानाप्रमाणें केळे आहेत. तें ऐकून बादशहा मनांत खजील होऊन त्यानें तो हुकूम रद्द करविला.

## गोष्ट २९ वी.

( हत्तीचें पाऊल. )

एके दिवशीं राणीचा भाऊ तिला भेटण्याकरितां ह्मणून आला. त्यावेळेस राणीच्या मनांत असें आलें कीं, बिरबलाची जागा आपण आपल्या भावास देववावी. संध्याकाळीं बादशहा रंगमहाळांत आल्यावर तिनें युक्ति युक्तीनें ती गोष्ट बादशहाच्या कानावर घातली. तेव्हां बादशहानें पुष्कळ प्रकारें तिची समजूत केली, परंतु ती ऐकेना. तेव्हां बादशहानें 'ठीक आहे' असें उत्तर दिलें.

दुसरे दिवशीं बादशहानें बिरबलास बोलावून सर्व हकीगत सांगून त्यास ह्मटलें कीं, सध्यां फक्त चार दिवस तूं घरीं रहा. असें सांगून त्यास रवाना केलें.

संध्याकाळीं नवीन नेमलेल्या वजीरासह बादशहा फिरावयास निघाला. चालतां चालतां रस्त्यांत एके ठिकाणीं हत्तीचें पाऊल स्पष्ट उमटलेलें आहे, असें पाहून बादशहानें आपल्या नवीन वजीरास हुकूम केला कीं, हें हत्तीचें पाऊल दोन दिवस आपण राखावें. त्याप्रमाणें तो तेथें उपाशीं, दोन दिवसपर्यंत त्या पाऊलास कांहीं एक धक्का न पोहोंचे अशा तजविजीनें राहिला.

तिसरे दिवशीं बादशहानें बिरबलास बरोबर घेऊन त्या ठिकाणीं येऊन आपल्या नवीन वजीरास ' पाऊल कसें काय राखलें आहे ' ह्मणून विचारलें. तेव्हां तें पाऊल त्यानें बादशहास दाखविलें मग बिरबलास त्या पावलाची रखवाल्दारी करण्यास सांगून बादशहा नवीन वजीरासह परत आला.

इकडे बिरबलानें त्या पावला सभोंवती मोठमोठ्या मेखा ठोकून प्रत्येकास लांब लांब दोऱ्या बांधिल्या, व आजूबाजूच्या घरवाल्यांस सक्त हुकूम केला कीं. तुह्मी आपलीं घरें खालीं करावीं. कारण बादशहाचा हुकूम मला बजावणें आहे. तें ऐकून त्या सर्व लोकांनीं बिरबलाची विनवणी करून कोणी हजार, कोणी पांचशें व कोणी शंभर असे रुपये देऊन आपण तीं घरें न मोडण्याविषयीं सांगितलें. ती सर्व सुमारें दहा हजारांची रक्कम घेऊन बिरबल बादशहाजवळ आला. व त्यास सर्व वर्तमान सांगितला.

नंतर बादशहानें तें सर्व वर्तमान राणीस सांगितलें व ह्मटलें कीं, पहा तुझ्या भावाची अक्कल जास्त कीं बिरबलाची अक्कल जास्त ? तेव्हां राणीनें ती जागा बिरबलास योग्य आहे असें कबूल करून तीही बिरबलास पूज्य मानूं लागली व बिरबल आपल्या जागेवर पूर्ववत् काम करूं लागला.

---

## गोष्ट ३० वी.

( बादशहाचे चार प्रश्न. )

एके दिवशीं बादशहानें बिरबलास सांगितलें कीः–' आतां आहे मग आहे. ' दुसरी ' आतां नाहीं मग नाहीं. ' तिसरी

'आतां नाहीं मग आहे.' आणि चवथी 'आतां आहे पण मग नाहीं.' ह्या चार वस्तु आणून दे.' बादशहाची ही मागणी ऐकून बिरबलानें प्रथम आपण थोडे विचारांत पडलों आहों असें दाखविलें; त्याबरोबर दरबारी मंडळीस मोठें समाधान वाटलें. परंतु थोडे वेळानें एकदम उत्तेजन आल्यासारखें दाखवून बिरबल ह्मणालाः—'आपण ज्या चार वस्तु मागितल्यात त्यांपैकीं एक तर तुमचे जवळच आहे, पण बाकीच्या तीन वस्तु मिळविण्यास आपणा उभयतांसही शहरांत गेलें पाहिजे ह्मणजे ताबडतोब मी त्या मिळवून तुमचे पदरांत घालतों. बिरबलाचें हें भाषण ऐकून बादशहास मोठें नवल वाटलें; कारण ह्या चार वस्तु जगांत असतील अशी त्याजी खात्री नव्हती. तथापि कांहींतरी बोलून बिरबलाच्या अकलेची परीक्षा पहावी हाच त्याचा उद्देश होता. परंतु जेव्हां बिरबलानें ह्या चारी वस्तु पैदा करून देतों असें सांगितलें तेव्हां निरुपाय होऊन बादशहानें त्याजबरोबर शहरांत येण्याचें कबूल केलें.

इतका प्रकार झाल्यावर बिरबलानें बादशहास जटाधारी बैराग्याचें सोंग देऊन आपण त्याचा शिष्य बनला, आणि बरोबर दोन मुलें घेऊन ते दोघेही शहरांतील मुख्य बाजारांत गेले. नंतर एका धनाढ्य व्यापाऱ्याच्या दुकानावर जाऊन शिष्यवेषधारी बिरबल सावकारास हात जोडून ह्मणाला—'आह्मी दोघेही गुरु–शिष्य या मायामोहक संसारास त्रासून देहाचें सार्थक करावें या हेतूनें ईश्वर भजनांत कालक्षेप करण्याचा निश्चय करून निघालों आहों. परंतु एका गोष्टीची मोठी पंचाईत पडल्यामुळें

आपल्या औदार्याची सर्व जगभर पसरलेली कीर्ती ऐकून तुह्मा-कडे आलों आहों तरी तिचें निवारण होऊन आमचें संकट दूर होईल अशी जी आशा आहे ती ईश्वर पूर्ण करो.'

वेषधारी बिरबलाचें हें भाषण ऐकून सावकार नम्रतेनें ह्मणा-ला-'आपली अडचण माझ्या हातून निवारण होण्यासारखी असल्यास या दासास सांगा ह्मणजे मी ती तत्काळ पूर्ण करीन. हें ऐकून बिरबल महंतरूपी बादशहाकडे बोट दाखवून ह्मणाला-'या गुरुजींचीं दोन मुलें विद्याभ्यासा करितां या शहरीं ठेवण्या-चा त्यांचा मनोदय आहे. परंतु या कृत्यास निदान चार हजार रुपये तरी लागतील. कारण त्यांचा अन्नवस्त्राचा व विद्याभ्यासा-चा यथास्थित बंदोबस्त झाला पाहिजे, या करितां कृपाकरून आमची एवढी अडचण दूर करा.' असें ह्मणून त्यानें बरोबर आणलेलीं मुलें सावकारास दाखविलीं. त्याबरोबर कांहींएक न बोलतां सावकारानें ४ हजार रुपये आणून त्या दोघां गुरुशिष्यां-पुढ ठेविले. हें पाहून वेषधारी बिरबल ह्मणाला. आपण आह्मांवर हे जे उपकार केलेत त्यांबद्दल आह्मास तुमचें कांहीं तरी उतरा-ई झालें पाहिजे. हें ऐकून सावकार त्याही गोष्टीस मान्य झाला. त्याबरोबर बिरबलरूपी शिष्यानें आपल्या पायांतील जोडा काढू-न हातांत घेतला आणि सावकारास ह्मणाला-तुझ्या मस्तकावर मी एकेक जोडा मारितों आणि मग तूं आह्मांस एकेक रुपया दे. बिरबलाचें हें भाषण ऐकून त्या दुकानावरील सर्व मंडळी आश्च-र्यानें अगदीं थक्क होऊन त्यास दुकानांतून घालवूं लागली. परंतु सावकार सर्वांस गप्प बसावयास सांगून या दोघां महंतांस

ह्मणाला—'जर या रुपयांचा सत्कारणीं खर्च होत आहे तर मी प्रत्येक रुपयाबद्दल एकेक जोडा सोसण्यास तयार आहें.' असें ह्मणून तो डोकीचें पागोटें काढून बादशहा व बिरबल यांच्यापुढें उभा राहिला.

सावकाराची ही सत्कर्मावरील निष्ठा, औदार्य परोपकारबुद्धी आणि विटंबना सोसूनही सत्कर्मीं द्रव्य खर्चण्याची उत्कंठेच्छा पाहून बिरबल आनंदसमुद्रांत पोहूं लागला. व सावकारास मोठी शाबासकी देऊन ह्मणाला "आह्मांला जें कांहीं पाहिजे होतें तें तुजजवळ मिळाल्यामुळें आमचें इच्छित कार्य झालें. आतां आह्मांस तुझ्या रुपयांची जरूर नाहीं." असें ह्मणून त्याचें समाधान करून महंतरूपी बादशहास ह्मणाला—"महाराज आपली पहिली वस्तु "आतां आहे मग आहे" ही पदरांत पाडून घ्या. आतां ती कशी घ्याल तर पहा! परमेश्वरकृपेनें या सावकारास आतां आहे ह्मणजे विपूल संपत्ती, भूतदया, नम्रता, परोपकारेच्छा, व औदार्य इत्यादि गुणांनीं जर हा परिपूर्ण आहे तर "मग आहे" ह्मणजे परमेश्वर अशा पुरुषाला सौख्यच देणार. अर्थात आतां आहे "सौख्य" आणि मगही आहे "सौख्य" हीच आपली पहिली वस्तु.

बिरबलानें याप्रमाणें पहिली वस्तु बादशहास प्राप्त करून दिल्याबरोबर तो अगदीं चकित झाला. नंतर ते उभयतांही सावकाराचा निरोप घेऊन पुढें जाऊं लागले. इतक्यांत एक भिकारी लोकांस उपदेश करीत होता कीं, आपण सर्व एका ईश्वराचीं लेंकरें आहोंत याकरितां परस्परांनीं परस्परांविषयीं भूतदया व

परोपकारबुद्धी आपल्या मनांत अवश्य बाळागली पाहिजे." हा त्याचा उपदेश ऐकून एका दयाळु गृहस्थानें कांहीं अन्न त्यास दिलें. त्याबरोबर तो भिकारी उपदेश करण्याचें सोडून गांवाबाहेर जाऊन एका तळ्याच्या कांठीं त अन्न खात बसला. बिरबलास जरूर ह्मणून तोही बादशहास बरोबर घेऊन ज्या ठिकाणीं तो भिकारी बसला होता तेथें आला आणि त्यास ह्मणाला—आह्मी दोघेही गुरुशिष्य आज चार दिवसाचे उपोषित असल्यामुळें भुकेनें आमचे प्राण जाऊं पहात आहेत. याकरितां कृपा करून आह्मांस थोडें अन्न दिल्यास परमेश्वर तुमचें कल्याण करील. याप्रमाणें बिरबलानें बरीच त्याची विनवणी केली. परंतु तो भिकारी याच्या बोलण्याकडे बिलकुल लक्ष न देतां एकसारखा जेवीतच सुटला. हें पाहून बिरबलास अतिशय राग येऊन त्यानें त्याच्या दोन चार थोबाडींत लगावल्या आणि सांगितलें कीं—"जा मूर्खा तुला आतांही नाहीं आणि मगही नाहीं" कारण जो मनुष्य उपदेशाप्रमाणें आचरण करीत नाहीं. त्याला परमेश्वर "आतां नाहीं आणि मगही नाहीं" ह्मणजे या लोकींही सुख नाहीं आणि परलोकींही सुख नाहीं अशाच स्थितींत ठेवितो. कारण जर जमीनींत धान्य पेरिलें तरच तें पुढें पिकेल. या न्यायानें "आतां नाहीं मग नाहीं" अशीच तुझी अवस्था होणार असें ह्मणून बादशहास ही दुसरी वस्तु पदरांत घेण्यास सांगितलें.

नंतर बिरबलानें एक अति गरीब, नम्र व सर्वदां ईश्वरभजनांत निमग्न राहणारा असा साधु बादशहास दाखविला आणि

सांगितलें कीं, " आतां नाहीं पण मग आहे " ही जी आपली तिसरी वस्तु ती पदरात घ्या. कारण ह्या साधुजवळ आतां कांहीं नाहीं ह्मणजे अन्न, वस्त्र, द्रव्य, मान व सौख्य यां पैकीं कांहीं एक नाहीं. परंतु याणें आपलें सर्व लक्ष ईशसेवेकडे लावलें असल्यामुळें पुढें ह्यास ह्या सर्व गोष्टी प्राप्त होतील सारांश आतां ह्मणजे ह्या लोकीं जरी सुख नाहीं तरी मग ह्मणजे परलोकीं हा सर्व सौख्यांचा राजा होणार आहे. ह्मणून हीच आपली तिसरी वस्तु " आतां नाहीं पण मग आहे " पदरांत घ्या. ह्याप्रमाणें तीन वस्तु पदरांत पडल्याबरोबर बादशहा चकित होऊन ह्मणाला— आतां चवथी वस्तू दाखीव. हें ऐकून बिरबर ह्मणाला–ती दाखविण्यास दूर जावयास नको. कारण ती तुह्मांजवळच आहे. थोडा विचार करा ह्मणजे झालें. या बोलण्यावर बादशहानें बराच वेळ विचार केला परंतु त्याला कांहींच समजेना. शेवटीं तो बिरबलास ह्मणाला ' माझेजवळ चवथी वस्तु कोठें आहे ती दाखीव, तेव्हां बिरबलानें सांगितलें " आतां आहे परंतु मग नाहीं " ही जी तुमची चौथी वस्तु ती तुह्माजवळ मूर्तिमंत उभी आहे. कशी ह्मणाल तर तुमच्या पूर्वीच्या पुण्याईमुळें आतां तुह्मांस राज्यपद प्राप्त झालें आहे परंतु मग ह्मणजे परलोकीं काय आहे. कारण राज्याअंतीं नर्कवास असल्यामुळें आतां जर तुह्मीं परोपकारबुद्धी धर्मनीती, ईश्वराचें स्मरण, चोख व मर्यादशील असें आचरण, भूतदया इत्यादि गोष्टी कराल तरच परमेश्वर तुह्मांवर कृपा करील. नाहींपेक्षां अखेरीस नर्कवासच भोगणें आहे. सारांश आतां आहे ह्मणजे राज्य, लक्ष्मी, सत्ता, ही

तुह्मांस परमेश्वरानें दिलीं आहेत, परंतु मग ह्मणजे परलोकीं ह्यां पैकीं कांहीं सौख्य नाहीं. अर्थात " आतां आहे पण मग नाहीं " ह्या चौथ्या वस्तूच्या वर्गांतील आपण आहांत. ईश्वरानें आतां जर तुह्मांस सर्व सौख्यें अनुकूळ केलीं आहेत तर यथान्याय वागून ज्यानें परलोकीं हित होईल अशीं कृत्यें केलीं पाहिजेत. नाहींपेक्षां " आतां आहे पण मग नाहीं " अशी स्थिती खचित होणार ! हें बिरबलाचें भाषण ऐकून बादशहास त्याच्या बुद्धीचें मोठें आश्चर्य वाटलें, व असा चातुर, ज्ञानी व बुद्धिवान मनुष्य आपल्या संग्रहीं आहे व त्याचे संमतीनें अप्रतिम ज्ञानाचा लाभ झाला ह्मणून तो आपणास अतिशय धन्य मानूं लागला. नंतर ते उभयतां परत दरबारांत आल्यावर बादशहानें सर्व दरबारी मंडळी समक्ष बिरबलाची स्तुति केली. व त्यास मोठें बक्षीस देऊन " बिरबलासारखा शहाणा दुसरा कोणी नाहीं. " असें ठरवून त्यास अकलेचा बहाद्दर असा किताब दिला. त्या दिवसापासून सर्व मंडळीस बिरबलाची मोठी वचक वाटूं लागल्यामुळें ते सर्व लोक त्याजबरोबर सलोख्यानें वागूं लागले.

भाग २ रा समाप्त.



सूचना-हीं पुस्तकें माधव बागेनजी-
क शंकर गणपत चिंचणकर यां-
चे दुकानीं विकत मिळतील.